ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53-
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ३० जुलै, १९५२ | अंक ३१

## विविध माहिती

**नेपाळचें स्वतःचें चलन**—नेपाळ व भारतामधील व्यापारांत नेपाळला अनुकूल तफावत आहे. परंतु सध्या नेपाळमध्यें भारतीय व नेपाळी अशीं दोन्हीं चलनें चालू असल्यानें नेपाळला त्याचा फायदा मिळत नाहीं, असें समजतें. येत्या दोन वर्षांच्या काळांत नेपाळ आपल्या प्रदेशांत संपूर्णतया आपलें स्वतंत्र चलन चालू करण्याचा विचार करीत आहे.

**मोठे पगार कापले तरी काय ?**—भारतीय सरकारच्या ज्या नौकरांना सध्या १,००० रुपयांपेक्षां अधिक मासिक पगार मिळतो तो जर १,००० रुपयांवर आणून ठेवला तर वाचणाऱ्या पैशांतून इतर सरकारी नौकरांना फक्त मासिक २॥ आणे अधिक मिळूं शकतील, असा हिशोब करण्यांत आला आहे.

**कबुतरांचा वृत्तवाहनासाठीं उपयोग**—डब्लिनमधील वृत्तपत्रें कांहीं दिवसांपूर्वी संपामुळें बंद पडलीं असतां कबुतरांनीं बातमी पोंचविण्याचें काम केलें. फुटबॉलच्या एका अटीतटीच्या सामन्याची बातमी आयर्लंडभर पोंचविण्यासाठीं त्यांचा उपयोग करण्यांत आला. तारायंत्रें निघण्यापूर्वी वृत्तवाहकाचें काम कबुतरें करीत असत.

**ब्रिटिश साहित्यिकांचीहि दैनाच**—सर कॉम्प्टन मॅकेंझी ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश ग्रंथकारावर, कर भरण्यासाठीं आपलें रहातें घर विकण्याचा प्रसंग आला असें समजतें. त्यांना २० पुस्तकांवरील कॉपीराइटच्या हक्कांसाठीं १०,००० पौंड मिळाले होते. ह्या रकमेवर कर बसवितां येत नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें. पण कोर्टानें तें अमान्य केलें. मि. मॅकेंझी ह्यांनीं ६० लोकप्रिय पुस्तकें लिहिलेलीं आहेत.

**राज्याभिषेकासाठीं नवीं तिकिटें**—दुसऱ्या एलिझाबेथ राणीचे राज्यारोहणाच्या दिवशीं न्यूझीलंडच्या सरकारनें नवीं पोस्टाचीं तिकिटें काढण्याचें ठरविलें आहे. ह्या नव्या तिकिटांत दोन पेन्सपासून पुढील किंमतीचीं तिकिटें असतील. राज्याभिषेकानंतर काढण्यांत येणाऱ्या नेहेमीच्या तिकिटांवर राणीचा फोटो छापण्यांत येणार आहे.

**डॅनिश संस्थेची देणगी**— डॅनिश-इंडिअन रिलीफ कमिटीनें भारतामधील दुष्काळग्रस्त भागांना मदत म्हणून भारतीय सरकारकडे पुढीलप्रमाणें वस्तु पाठविल्या आहेत. १०,००० पौंड दुधाची भुकटी, ४५ पाण्याचे हातपंप, आणि ६,९९,००० अन्नसत्त्वाच्या गोळ्या. हातपंप मद्रासच्या रायलसीमा भागांत पाठविण्यांत आले.

**डी. डी. टी. चा कारखाना**—दिल्ली येथें डी. डी. टी. चा एक कारखाना काढण्याचें आतां जवळ जवळ निश्चित झालें आहे. हा कारखाना काढण्याच्या कामीं भारतीय सरकारला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आरोग्य व शास्त्रीय संघटनांतर्फे मदत करण्यांत येणार आहे.

**लोकसभेच्या सदस्यांचा भत्ता**—भारतीय लोकसभेच्या सदस्यांना आतांपर्यंत ४० रुपये दैनिक भत्ता मिळत असे, तो ह्यापुढें ३५ रुपये मिळणार आहे. त्या भत्त्यावर प्राप्तीवरील कर आकारला जात नाहीं. सदस्यांना भत्त्याऐवजीं मासिक पगार देण्याचा विचार मात्र रद्द झाला आहे.

**केवढें मोठें कर्ज हें**—अमेरिकेच्या रीकन्स्ट्रक्शन फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्या संस्थेनें तांबें आणि मोलिब्डेनम् ह्यांचें उत्पादन वाढविण्यासाठीं एका कंपनीला ९,४०,००,००० डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. संस्थेच्या इतिहासांत एवढें मोठें कर्ज दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**भारतामधील मच्छिमारीचा धंदा**—भारतामधील मच्छिमारीचे धंद्याचा विकास करण्यासाठीं अमेरिकेकडून २४,६२,००० डॉलर्स रक्कम मिळणार आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या धंद्यासाठीं भारतीय सरकारनें ६९ लाख रुपये खर्च करण्यासाठीं राखून ठेवले आहेत.

**कॅनडांतील कागदाचें उत्पादन**— जून १९५१ मध्यें कॅनडांतील कागदाच्या गिरण्यांनीं ४,५१,९९५ टन कागद तयार केला. ह्याच महिन्यांत कॅनडानें ४,८३,७९१ टन कागद परदेशीं पाठविला. १९५१ च्या जून महिन्यापेक्षां ही निर्यात ८,७५७ टन अधिक आहे. वरील निर्यातींपैकीं ४,११,४९९ टन कागद अमेरिकेंतील ग्राहकांनीं घेतला

**भारतांतील मोटारींची संख्या**— आशिआंतील सर्व राष्ट्रांपेक्षां भारतांत सर्वांत अधिक मोटारी आहेत असें समजतें. कांहीं प्रमुख राष्ट्रांतील मोटारींची संख्या पुढीलप्रमाणें आहे. भारत २,७४,२०६; जपान १,६३,३२५; फिलिपाइन्स ९७,६५०; इंडोनेशिआ ६४,८०० व सीलोन ६३,०१६.

**ढाक्क्याचा वीज पुरवठा**—ढाक्का शहराला करावयाच्या वीजपुरवठ्यांत सुधारणा करण्यासाठीं पाकिस्तान सरकारनें पूर्व बंगालला कर्ज देण्याचें ठरविलें आहे. तथापि, ही मंजुरी फक्त तात्त्विक असून प्रत्यक्ष रक्कम दिली जाण्यास अद्याप अवकाश आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्याचा ताळेबंद
### ( १८ जुलै, १९५२ )

| देणें | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,००,००,००० | नोटा | ३२,९२,४६,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,००,००,००० | रुपये | ९,३३,००० |
| ठेवी:— | | दुय्यम नाणीं | २,३१,००० |
| मध्यवर्ती | | खरेदिलेलीं व | |
| सरकारच्या | १८,४४,३६,००० | डिस्कौंट | |
| इतर | | केलेलीं बिलें | ७९,००,००० |
| सरकारांच्या | ६,३६,५४,००० | सरकारी ट्रेझरी | |
| बँकांच्या | ५५,१८,७६,००० | बिलें | ५८,९३,००० |
| इतर | ६२,३३,८९,००० | परदेशांतील | |
| बिल्स | ३,०४,४९,००० | शिलका | १०७,०७,१३,००० |
| इतर देणीं | ११,९८,४३,००० | सरकारांस कर्जे | ३,४८,००,००० |
| | | इतर कर्जे | ९,९५,२८,००० |
| | | गुंतवणूक | ८७,०२,५७,००० |
| | | इतर जिंदगी | ५,४१,४६,००० |
| एकूण रु. | २,४७,३६,४७,००० | एकूण रु. | २,४७,३६,४७,००० |

## रिझर्व्ह बँकेच्या नोटा व त्यांचें तारण
### ( १८ जुलै, १९५२ )

| देणें | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| बँकिंग खात्यां- | | सोनें | ४०,०१,७१,००० |
| तील नोटा | ३२,९२,४६,००० | विदेशी रोखे | ५,६८,१५,११,००० |
| प्रसृत नोटा | ११,१७,७५,२६,००० | रुपये | ७७,८७,४०,००० |
| | | भारत | |
| | | सरकारचे रोखे | ४,६४,६३,५०,००० |
| एकूण रु. | ११,५०,६७,७२,००० | एकूण रु. | ११,५०,६७,७२,००० |

## घाऊक किंमतींतील चढउतार

अधिकृत निर्देशांकाच्या परिमाणानुसार ( मूळ प्रमाण ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष = १०० धरून ) १२ जुलै अखेरच्या आठवड्यांत निरनिराळ्या मालाच्या घाऊक किंमतींचा निर्देशांक ०·५% वाढून ३८३·४ वर गेला. त्या मागील महिन्याच्या तत्सम निर्देशांकापेक्षा तो ३·०% ज्यास्त होता, परंतु गतवर्षीपेक्षा १४·२% नें कमी होता.

### घाऊक किंमतींचे निर्देशांक
( ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष = १०० )

| | अखेर संपलेला आठवडा | | | |
|---|---|---|---|---|
| | १२-७-५२ | ५-७-५२ | १४-६-५२ | १४-७-५१ |
| अन्नपदार्थ | ३६५·७ | ३६४·४ | ३४६·१ | ४०७·४ |
| औद्योगिक कच्चा माल | ४३६·८ | ४२८·५ | ४२७·७ | ६४०·७ |
| अर्ध पक्का माल | ३४६·५ | ३४५·१ | ३२५·६(R) | ३८०·४ |
| पक्का माल | ३६८·९ | ३६९·७ | ३७५·५ | ४०६·७ |
| इतर | ६३२·० | ६२४·३ | ५८४·२ | ७१६·० |
| सर्व प्रकारचा माल | ३८३·४ | ३८१·५ | ३७२·१ | ४४६·६ |

### सहकारी संस्थांच्या चालकांवरील जबाबदारी

"सहकारी संस्थांनीं आतां फार मोठी आर्थिक जबाबदारी घेतली आहे. पैशाचा मोठा पुरवठा करूनहि, अद्यापही कित्येक सहकारी संस्थांची आर्थिक गरज व विशेषत: मध्यम मुदतीच्या कर्जाची मागणी पुरविणें सहकारी संस्थांना अवघड होऊन बसलें असून, त्यामुळें अप्रियताही पत्करावी लागत आहे. मुंबई प्रांतिक बँकेनें सहकारी सोसायट्यांच्या सभासदांची आर्थिक गरज भागवितांना अग्रहक्क चालू शेतीसाठी द्यावा, असें धोरण आखलें असून नवीन होणाऱ्या सभासदांनाही कर्ज पुरविणें हें जादा पैसा उपलब्ध होणेवर तहकूब ठेवण्याचें धोरण ठरविलें आहे. सोसायटीच्या चालकांनीं सभासद सोसायटीशीं चोख व्यवहार करतात किंवा नाहीं व ठराविक वेळीं आपली जबाबदारी पार पाडतात किंवा नाहीं याकडे लक्ष द्यावयास पाहिजे. सोसायट्यांच्यावरील ही जबाबदारी सामुदायिक अशी असल्यामुळें सोसायटीचा व्यवहार त्या दृष्टीनें चालला पाहिजे, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. केवळ कांहीं सभासद नियमित वागणारे आहेत म्हणून त्यांच्याच पुरतां व्यवहाराचा विचार करावा असें म्हटल्यास सामुदायिक जबाबदारी रहाणार नाहीं."—श्री. य. द. खोले, पुणें सें. को. बँकेचे चेअरमन, ह्यांचे नारायणगांव उपशाखेच्या उद्घाटनप्रसंगीं स्वागतपर भाषण.

### पोलादाच्या उत्पादनांत भारताचें स्थान

१९५१ मध्यें पोलादाचें जागतिक उत्पादन २०·६ कोटी टन झालें. हें उत्पादन १९५० मधील उत्पादनापेक्षां ११% अधिक आहे. सर्वांत ज्यास्त उत्पादन—९ कोटी टन—अमेरिकेंत झालें. रशिया ३ कोटी टन, ग्रेटब्रिटन १½ कोटी टन, असे पुढील दोन अनुक्रम आहेत. जपानचें उत्पादन ६४ लक्ष टन भरलें. भारतांतील उत्पादन १५ लक्ष झालें. अर्थात्, १९३७ मधील ९ लक्ष टनांपेक्षां हें उत्पादन पुष्कळच ज्यास्त आहे. कांहीं देशांचीं उत्पादनाचीं उद्दिष्टें खालीं दिलीं आहेत:—

| | |
|---|---|
| अमेरिका—१९५४ मध्यें, | १२ कोटी टन |
| ग्रेटब्रिटन—१९५३ मध्यें, | १·८ कोटी टन |
| जपान —१९५३ मध्यें, | ६० लक्ष टन |
| भारत —१९५५–५६ मध्यें, | २२½ लक्ष टन. |

**तांब्याच्या निर्मितींत क्रांति**—कोलंबो योजनेखालीं डॉ. एम्. आर. श्रीनिवासन् हे भारतीय शास्त्रज्ञ मेलबोर्न विद्यापीठांत संशोधनाचें कार्य करीत आहेत. त्यांनीं लावलेल्या एका शोधामुळें ऑस्ट्रेलियांतील तांब्याच्या उत्पादनांत क्रांतिकारक सुधारणा होईल, असें समजतें.

**विक्री-करापासून उत्पन्न**—मध्यप्रदेश सरकारला विक्रीकरापासून १९५०–५१ व १९५२–५३ सालीं अनुक्रमें २,३७,७५, ००० रुपये आणि २,३६,४८,००० रुपये उत्पन्न झालें. विड्याच्या पानावर बसविलेल्या विक्रीकरापासून राज्यसरकारला दरवर्षी सुमारें १॥ लाख रुपये उत्पन्न होतें.

**मद्रास सरकारला तोटा**—मद्रास सरकारच्या मालकीचे कांहीं भारतीय सरकारी रोखे होते. त्या राज्यामधील रायलसीमा भागांतील दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी हे रोखे मद्रास सरकारला विकावे लागले. हा विक्रीचा व्यवहार रिझर्व्ह बँकेतर्फे पार पाडण्यांत आला. तरी सुद्धां त्यांत मद्रास सरकारला २२·५ लाख रुपयांची खोट खावी लागली.

# अर्थ

बुधवार, ता. ३० जुलै, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांतील पहिल्या चाकोलेट कारखान्याची प्रगति

### साठे बिस्किट व चॉकोलेट कं. लि.

साठे बिस्किट व चॉकोलेट कंपनीच्या प्रगतीचा आढावा कंपनीचे अध्यक्ष, श्री. गं. वि. पुराणिक, ह्यांनीं कंपनीच्या तिसऱ्या वार्षिक सभेचे वेळीं घेतला. कंपनीनें विक्रीस काढलेलें २० लक्ष रुपयांचें सर्व भाग-भांडवल आतां खपलें आहे. पुणें-आळंदी रस्त्यावरील कंपनीच्या नव्या कारखान्यांतील बिस्किट विभागाची इमारत पूर्ण झाली आह व कामगारांना रहाण्यासाठी कांहीं घरेंहि तयार झाली आहेत. तेथें लवकरच उत्पादन सुरू होईल. श्री. साठे ह्यांनीं कंपनीच्या व बिस्किट-चाकोलेटच्या धंद्याच्या वाढीसाठी कसे सतत प्रयत्न चालविलेले आहेत व त्यांस कसें यश येत आहे; हें त्यावरून स्पष्ट दिसून येईल. तसेंच महाराष्ट्रीय कारखानदारींचा राष्ट्रीय दृष्टिकोनहि लक्षांत येईल, आणि महाराष्ट्रीय कारखान्यांच्या प्रश्नांकडे पहातांना स्वतंत्र बुद्धीनें मत बनविण्याचें अगत्यहि पटेल, असा विश्वास वाटतो.

कंपनीच्या चॉकोलेटच्या धंद्यांत यंदा बरीच प्रगति झाली, हें कोको-चॉकोलेटच्या तीन वर्षांच्या खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| सन | विक्री |
|---|---|
| १९४९-५० | रु. १,४८,७१८ |
| १९५०-५१ | रु. ६,४६,०६५ |
| १९५१-५२ | रु. ९,२७,३८७ |

टॅरिफ बोर्डाच्या अहवालांत हिंदुस्थानांतील चॉकोलेटचें उत्पादन मागणीपेक्षा कमी आहे, असें नमूद करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांत चॉकोलेट उत्पादन करणारा हा एकच कारखाना, निदान आज तरी, आहे. या अहवालाचा आधार घेऊन सरकारनें एका जगविख्यात इंग्लिश कंपनीस मुंबईस कारखाना काढण्यास परवानगी दिली. वास्तविक हें कृत्य सरकारी धोरणाच्याविरुद्ध होतें; तथापि आतां पुढील वर्षापासून म्हणजे १९५३ नंतर या कारखान्यास निदान कच्च्या मालाच्या बाबतींत तरी साठे कारखान्याच्या पातळीवर आणण्यांत येणार आहे.

### भरपूर उत्पादनक्षमता

निदान उत्पादनाबाबतची तरी सरकारास सबब ठेवूं नये या उद्देशाने गेल्या वार्षिक सभेनंतर श्री. ग. रा. साठे हे पुन्हां इंग्लंड व युरोपांतील कांहीं देशांत फिरून तेथील कारखाने पाहून विशेषतः चॉकोलेट विभागासाठी आवश्यक त्या जादा आधुनिक यंत्रसामग्रीचें निरीक्षण करून व यंत्रांची मागणी करून आले होते. मागणी केलेल्यांपैकीं १-२ खेरीज सर्व यंत्रें आलीं असून तीं बसविण्यांतहि आलीं आहेत. नवीन यंत्रांमुळें व आणखी एक-दोन यंत्रें यावयाचीं आहेत तीं आलीं म्हणजे चॉकोलेट विभाग अद्ययावत् यंत्रसामग्रीनें सुसज्ज होणार आहे. या उरलेल्या यंत्रांची पाहणी करण्याकरितां कारखान्याच्या संचालकांपैकीं श्री. द. रा. साठे हे सध्या यूरोप व इंग्लंडमध्यें गेले आहेत. अशा रीतीनें उत्पादनक्षमता आतां भरपूर वाढली असून चॉकोलेट आयात करण्याची जरूरी उरली नाहीं.

कारखान्याच्या मॅनेजिंग एजंटांपैकीं श्री. ग. रा. साठे यांनीं आपले चिरंजीव कु. मनोहर यांस फूड टेक्नॉलॉजी या विषयाचा अभ्यास करण्याकरितां स्वतःच्या खर्चानें अमेरिकेंतील या विषयाबाबत प्रसिद्ध ॲम्हर्स्ट युनिव्हर्सिटींत पाठविलें आहे. ते या विषयाच्या पदवीपरीक्षेबरोबरच अमेरिकेंतील कांहीं बिस्किट व चॉकोलेट कारखान्यांत प्रत्यक्ष कामाचाहि अनुभव घेणार आहेत. लौकरच, दुसरे संचालक श्री. द. रा. साठे यांच्या चिरंजिवांनाहि इंग्लंडमध्यें कोको, चॉकोलेट व बिस्किट उत्पादन-विषयाच्या शिक्षणाकरितां मॅनेजिंग एजन्सीद्वारां पाठविण्यांत येणार आहे, असें कळतें. या दोघांच्याहि ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा कारखान्यास उपलब्ध होणार असला तरी त्यांच्या परदेशीं शिक्षणासाठी साठे कंपनीवर श्री. साठे ह्यांनीं कांहींच बोजा पडूं दिलेला नाहीं.

### टाटा कंपनीच्या कामगारांना बोनस

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. आणि टाटा वर्कर्स युनियन ह्यांचेमधील ठरलेल्या कोष्टकाप्रमाणें, कंपनीनें मार्च अखेरच्या वर्षासाठी कामगारांना १ कोटी, ७ लक्ष रुपये बोनस मंजूर केला आहे. ही रक्कम ३ महिने, ७ दिवस एवढ्या काळाच्या रोजंदारीइतकी व कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या २७½% इतकी भरते. गेल्या वर्षी कामगारांच्या वांट्यास १, कोटी, १ लक्ष, ९६ हजार रुपये आले होते.

### हिंदी चहाचा प्रचार

हेलसिंकी येथील ऑलिंपिक सामन्यांत भाग घेणाऱ्या प्रत्येक खेळाडूला भारत सरकारतर्फे एक पौंड उत्कृष्ट हिंदी चहा भेट म्हणून देण्यांत आला. एकूण ६,००० पौंड चहा वांटण्यांत आला, त्याला ५०,००० रु. खर्च आला.

### बद्रिनाथला फोन करतां येईल

बद्रिनाथ गांव टेलिफोननें आतां इतर गांवांशीं जोडण्यांत आलें आहे.

### धरणीकंपाचा विमा

जपानमध्यें धरणीकंपाचा विमा उतरण्यास प्रारंभ करण्याची परवानगी अमेरिकन फॉरिन इन्शुअरन्स असोसिएशननें अर्थमंत्र्यांकडे मागितली आहे. जपानमध्यें वारंवार धरणीकंप होतात, त्यामुळें त्यांच्या विम्याचा व्यवसाय फायदेशीर होत नाहीं, असें जपानी कंपन्यांना वाटतें. अमेरिकन कंपन्यांच्या अर्जाचा जपानी अर्थखातें विचार करीत आहे.

**बेल्जममध्यें जुने संस्कृत ग्रंथ**— भारताचे पोस्ट खात्यांतील एक वरिष्ठ अधिकारी मि. जेराथ हे इंटरनॅशनल पोस्टल कॉंग्रेससाठी ब्रुसेल्सला गेले होते. तेथील एका प्राध्यापकाजवळ कांहीं जुने संस्कृत ग्रंथ असल्याची माहिती त्यांनीं आणली आहे.

## अमेरिकेंतील भाग–भांडवलाची मालकी

कोणत्याही देशांतील भांडवलाची मालकी समाजाच्या निरनिराळ्या वर्गांत अगर थरांत कशी पसरलेली आहे, हा प्रश्न अलीकडे विशेष महत्त्व पावूं लागला आहे. पण अशा तऱ्हेची माहिती बहुधा विनायास उपलब्ध होऊं शकत नाहीं. न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजनें ह्या बाबतींत एक उपयुक्त उपक्रम केल्याचें समजतें. न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजनें ब्रुकलिंग्ज इन्स्टिट्यूट ह्या संस्थेला वरील प्रकारची माहिती गोळा करून एक अभ्यास पुस्तक तयार करण्यास सांगितलें आणि या संस्थेनें परिश्रमपूर्वक तें काम पार पाडलें. ह्या पुस्तकाचें नांव ‘ अमेरिकेंतील भाग–भांडवलाची मालकी ’ असें आहे.

पुस्तकावरून असें दिसून येतें कीं, अमेरिकेंत भाग-भांडवलाची मालकी बऱ्याच नागरिकांवर विस्तार पावलेली आहे. अमेरिकेंत वयांत आलेल्या प्रत्येक १६ नागरिकांत निदान एक तरी भाग-भांडवलाचा मालक असतो, आणि प्रत्येक दहाव्या कुटुंबांत एक अगर अधिक व्यक्ती भाग-भांडवलाचे मालक असतात. अशा व्यक्तींची एकूण संख्या ६५ लाखांच्या आसपास आहे. त्यांच्याजवळ बहुधा सार्वजनिक कंपन्यांचे भाग आहेत; आणि त्यांच्यापैकीं ७६ टक्के लोकांना दरवर्षी कर वजा जातां १०,००० डॉलर्सपेक्षा कमी प्राप्ति होते. सुमारें १६,६५५ कंपन्यांचे भाग सार्वजनिक या सदरांत मोडतात. अशा भागांची एकूण संख्या ५ अब्ज असावी. हे सर्व भाग सुमारें ३ कोटी भागांच्या गटानें निरनिराळ्या व्यक्तींच्या नांवानें आहेत. प्रत्येक स्त्रीच्या मालकीचे तीन भाग असतील तर पुरुषाच्या नांवानें चार पेक्षा जरा अधिक भाग असतात असें दिसून आलें आहे. भाग–धारकांत फर्म्सचे चालक आणि कॉलेजचे पदवीधर ह्यांचा भरणा अधिक दिसून येतो. न्यूयॉर्क शहरांत सर्वांत अधिक म्हणजे सुमारें ६० लाख भाग आढळून येतात. राष्ट्रांतील एकूण भागांशीं प्रमाण १/५ इतकें पडतें. भागावर होणारी प्राप्ती आणि भागांची मालकी ह्यांचा निकटचा संबंध आढळून येतो. ज्या कुटुंबांना १०,००० डॉलर्स अगर अधिक उत्पन्न येतें त्यांच्यापैकीं ५५ टक्के कुटुंबांत एक किंवा अधिक भाग–धारक आढळून येतात. ५,००० ते १,०,००० डॉलर्स उत्पन्न येणाऱ्या कुटुंबांत ही टक्केवारी २० आहे: ४,००० ते ५,००० डॉलर्स उत्पन्नाच्या गटांत भागधारक कुटुंबांची टक्केवारी ७ टक्के आहे. ह्याहीपेक्षा खालच्या उत्पनाच्या गटांत टक्केवारी आणखी कमी झालेली आहे. तथापि २,००० डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न मिळविणाऱ्या २,००,००० कुटुंबांतहि भागधारक आहेतच.

एकूण भागधारकांच्या संख्येपैकीं दोन तृतियांश लोकांच्या नांवावर दुसऱ्या महायुद्धापासून अगर तत्पूर्वीपासूनही भाग असल्याचें आढळून येतें. १/५ लोक त्यानंतर म्हणजे गेल्या तीन वर्षांत भागधारक झाले. सुमारें ६ टक्के लोकांनीं १९५१ सालीं प्रथमच भाग घेतले. त्याशिवाय सुमारें ३० लाख लोकांनीं १०० पेक्षा अधिक भागधारक नसलेल्या खाजगी कंपन्यांचे भाग घेतले आहेत. अशा कंपन्यांच्या भागांची खरेदी–विक्री शेअर-बाजारांत होत नाहीं.

### श्री. अनिखिंडी ह्यांचा मृत्यु

जमखिंडी येथील सहकारी कार्यकर्ते व जमखंडी सें. को. बँकेचे माजी चेअरमन, श्री. व्ही. एन. अनिखिंडी, हे गेल्या आठवड्यांत मृत्यु पावले.

### कापडाच्या निर्गतींत घट

१९५२ च्या पहिल्या पांच महिन्यांत भारतांतून १४·३ कोटी वार कापडाची निर्गत झाली. १९५० च्या पहिल्या पांच महिन्यांत ५९·१ कोटी वारांची व १९५१ च्या पहिल्या पांच महिन्यांत ४७·८ कोटी वार कापडाची निर्गत झाली होती. जाड्याभरड्या व तलम, दोन्ही प्रकारच्या कापडाची निर्गत आतां रोडावली आहे. खालील तक्ता निर्गतीची बिघडलेली परिस्थिति स्पष्टपणें दाखवीत आहे:—

( लक्ष वार कापड )

| कोठें निर्गत ? | जाने–मार्च १९५२ | जाने–मार्च १९५१ |
|---|---|---|
| सिंगापूर | ७७ | ११८२ |
| एडन | १०४ | २९४ |
| सिलोन | २३ | १९० |
| हाँगकाँग | ४ | १४० |
| मलाया | ५ | ८७ |
| इराक | २२ | ५७ |

### इनकमटॅक्सची वसुली

१९५१–५२ सालांतील इनकमटॅक्स खात्याच्या कारभाराची माहिती खालील तक्त्यावरून येईल. तुलनेसाठी १९५०–५१ चेहि आकडे दिले आहेत.

| | १९५१–५२ | १९५०–५१ |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न ( कोटी रु. ) | १८५ | १७५ |
| कर देणारांची संख्या | ८,८५,३९९ | ५,४०,००२ |
| संपविलेलीं प्रकरणें | ११,५९ ६१६ | ८,५६,२०९ |
| त्यांपैकी पूर्वीची साठलेली किती होतीं | ४,७२,१६१ | २,९७,५३६ |
| वर्षअखेरची येणें राहिलेली रक्कम ( कोटी रु. ) | ११३ | १५२ |
| प्रत्येक अधिकाऱ्यानें पुरी केलेली प्रकरणें, सरासरीनें | १,३३३ | १,११२ |
| वसुलीचा खर्च ( % ) | १·४४ | १·३९ |
| रिफंड केलेली रक्कम ( कोटी रु ) | २०·१६ | १८·२९ |
| अपिलांची संख्या | ७४,१४० | ६६,९१० |
| अपिलांचें असेसमेंटशीं प्रमाण ( % ) | ६·५ | ७·९ |

### नोकरांचा वाढदिवस साजरा करणारी बँक

पोर्टोरिको येथील एक बँक आपल्या नोकरांशीं चांगले संबंध राखण्यासाठी, त्या सर्वांचे वाढदिवस साजरे करते. प्रत्येक महिन्याला एक जेवणाचा समारंभ केला जातो व त्या वेळीं बँकेचे डायरेक्टर्स, अधिकारी आणि ज्यांचे वाढदिवस त्या महिन्यांत असतील ते नोकर उपस्थित असतात. त्या प्रसंगीं, वाढदिवस ज्यांचा साजरा होतो त्या प्रत्येकास बँकेतर्फे एक लहानशी भेट ( पैशाचें पाकीट, किल्ल्यांची साखळी, इ. ) दिली जाते. कांहीं कारणामुळें तो उपस्थित राहूं शकला नाहीं, तर त्याची भेट त्याच्या घरीं बँकेच्या एखाद्या अधिकाऱ्याच्या हातीं पाठविली जाते. ह्याचा नोकरवर्गाच्या मनावर फार चांगला परिणाम होतो. एक नोकर कोरिआंत सैनिक म्हणून गेला होता, तेथें पाँचगाँन येथें त्याला बँकेकडून वाढदिवसाचे दिवशीं भेट येऊन पोंचली. बँकेबद्दल त्याला त्यामुळें अत्यंत आत्मीयता वाटली व त्यानें बँकेस लिहिलें, “ देवाच्या दयेनें आपल्या बँकेची अशीच प्रगति होत राहो. मी लवकरच माझ्या बँकेतील मित्रांत येऊन मिळेन अशी मला आशा आहे.”

### अतिपूर्वेत भरणारी आंतरराष्ट्रीय व्यापारी जत्रा

सीट्रल (वॉशिंग्टन) येथील इंटर नॅशनल ट्रेड फेअर इनकॉ. ह्या संस्थेनें अतिपूर्वेकडील राष्ट्रांची एक व्यापारी जत्रा भरविण्याचे ठरविलें आहे. ही जत्रा १४ सप्टेंबरपासून १९ सप्टेंबरपर्यंत भरणार आहे. भारत, पाकिस्तान, जपान, हॉंगकॉंग, फिलिपाईन्स, फ्रेंच इंडोचायना, कोरिआ, सीलोन, फोर्मोसा, सयाम आणि इंडोनेशिआ इतक्या राष्ट्रांना आमंत्रणें देण्यांत आलीं आहेत. सीट्रल शहराच्या म्युनिसिपल सभागृहांत जत्रा भरविण्यांत येणार आहे. निरनिराळ्या देशांना आपआपल्या मालाचीं दुकानें उघडण्यासाठीं एकूण ७०,००० चौरस फूट इतकी जागा देण्यांत येईल. वॉशिंग्टन संस्थानांतील औद्योगिक आणि व्यापारी संस्थाही प्रदर्शनांत भाग घेणार आहेत. अतिपूर्वेकडील जे देश प्रदर्शनांत भाग घेतील त्यांना जागेसाठीं भाडें द्यावें लागणार नाहीं; शिवाय सीट्रल शहरांत प्रदर्शकांचा माल आणण्याची आणि तो पुन्हा परत नेण्याची जबाबदारी प्रदर्शन भरविणाऱ्यांनीं आपल्या अंगावर घेतली आहे. संस्थेचे एक प्रतिनिधी ह्या जत्रेच्या कामासाठीं सध्या अतिपूर्वेकडील राष्ट्रांत फिरत आहेत. अतिपूर्वेकडील राष्ट्रें हीं औद्योगिक दृष्ट्या मागासलेलीं आहेत. त्यांच्या कच्च्या मालाच्या किंमती गेल्या कांहीं महिन्यांत उतरलेल्या आहेत. अशा परिस्थितींत अमेरिकेसारख्या उद्योगप्रधान देशांत व्यापारी प्रदर्शन भरविण्याची कल्पना उचित वाटते. आपल्याजवळील कच्च्या मालाला अमेरिकेंत कितपत वाव आहे हें चांचपून पहाण्याच्या दृष्टीनें, अतिपूर्वेकडील राष्ट्रांना ह्या प्रदर्शनाचा उपयोग होण्यासारखा आहे; पण अखेर अमेरिकेच्या कच्च्या मालाच्या गरजेवरच मालाची मागणी अवलंबून राहील.

---

### ब्राझील व पाकिस्तान ह्यांच्या परिस्थितींत साम्य

ब्राझील आणि पाकिस्तान ह्या देशांच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितींत बरेंच साम्य आढळून येतें. दोन्ही देशांच्या चलनाची आंतरराष्ट्रीय किंमत वाजवीपेक्षां अधिक ठरविण्यांत आलेली आहे. परंतु दोन्ही राष्ट्रांचीं सरकारें आपआपल्या चलनाचें अवमूल्यन करण्यास मात्र तयार नाहींत. पाकिस्तानप्रमाणेंच ब्राझीलमध्येंही कापूस मोठ्या प्रमाणावर शिल्लक राहिला आहे. त्यामुळें कांहीं किमान किंमतीला बाजारांत येईल तो सर्व कापूस विकत घेण्याचें बंधन ब्राझीलच्या सरकारला घालून घ्यावें लागलें आहे. असें न करावें तर कापसाच्या किंमती पडून शेतकऱ्यांचें खूप नुकसान होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. सध्या बँक ऑफ ब्राझील ही १४ सेंटला १ पौंड ह्या दरानें कापूस विकत घेत आहे. परंतु ह्या दरानें कापूस परदेशीं विकून टाकण्याची मात्र कांहींच चिन्हें दिसत नाहींत. अर्थात् बँकेला ह्या व्यवहारांत ठोकर खाण्याची भीति वाटत आहे. ब्राझीलच्या कापसाचे मोठें गिऱ्हाईक म्हणजे ब्रिटन; पण ब्रिटन ब्राझीलकडून घ्यावयाच्या कापसांत ५० टक्के कपात करणार आहे, अशी वार्ता आहे. जपानला सध्या कापसाची फार गरज आहे; पण त्याला सुद्धा सध्यांच्या हुंडणावळीच्या दरांचा विचार करतां ब्राझीलचा कापूस फार महाग पडतो. ब्राझीलमधून निर्यात होणाऱ्या इतर कच्च्या मालाची स्थितीही थोड्याफार फरकानें कापसासारखीच झाली आहे. परदेशीय गिऱ्हाईक ब्राझीलच्या कच्च्या मालाच्या किंमती फार आहेत अशी हाकाटी करीत आहेत. आज ब्राझीलचे निर्यात-व्यापारी ह्या किंमतींना सुद्धां माल निर्यात करण्यांत फार नुकसान आहे, असें म्हणत आहेत.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| ह्यातींतील पॉलिसी | ह्यातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ

इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३१,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ५,६५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ३। कोटींचे वर |

★ बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केली असून बांधत असलेल्या स्वतःचे टोलेजंग इमारतींतहि तशी सोय होणार आहे.

★ एक्झिक्युटर व ट्रस्टीचीं कामें महाराष्ट्र एक्झिक्युटर आणि ट्रस्टी कंपनी करते.

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

### विणकरांच्या दुर्दशेवर मद्रास सरकारचा उपाय

मद्रास सरकारनें विणकरांच्या मदतीसाठीं एक योजना आखली आहे. ती तूर्त तीन महिने व कांहीं जिल्ह्यांतच चालू राहील. ह्या योजनेप्रमाणें, विद्यमान विणकर-सोसायट्यांना सरकार प्रत्येक नव्या विणकर सभासदासाठीं २५ रुपये शेअर भांडवल देईल. सोसायटींत विणकराला रोजगार मिळेल, त्यांतून सोसायटी हे पैसे हळुहळू वसूल करील. मदतीसाठीं सोसायटींत येणाऱ्या विणकराला अगदीं कमीत कमी असाच रोजगार मिळेल. ४० नंबराखालील सूत विणकरांना पुरविलें जाईल. त्याचें विणलेलें कापड सोसायटीला दिलें जाईल. ४० नंबरावरील सूत वापरणाऱ्या विणकरांचीहि स्थिति हलाखीची झाली असेल, तर अशा विणकरांनाहि सोसायट्यांत प्रवेश देऊन त्यांना तसें सूत विणावयास देण्याच्या प्रश्नाचा विचार सहकारी खात्याचे रजिस्ट्रार हे करतील. तयार मालाची विक्री करण्याची जबाबदारी ज्या त्या सोसायटीची आहे. स्टेट हँडलूम वीव्हर्स को. सोसायटीची मदत ह्या बाबतींत त्यांना अर्थात मिळेलच. ह्या योजनेंत सामील होणाऱ्या सोसायट्यांना त्यांच्या वाजवी व्यवहारांत होणारा तोटा भरून देण्याची जबाबदारी सरकारनें पत्करली आहे. बाजाराला पसंत पडेल असें आणि चांगल्या दर्जाचें उत्पादन व्हावें, ह्यासाठीं सरकारनें प्रत्येक पांच सोसायट्यांमागे एक असे सुपरवायझर नेमले आहेत. एका सोसायटीचे किती लोकांनीं सभासद व्हावें, ह्यावर निर्बंध न ठेवण्याचें सरकारनें ठरविलें आहे. मद्रास राज्यांत १,१०० सोसायट्या आहेत.

### स्त्री-आकर्षणामुळें रस्त्यांवरील अपघात

रस्त्यावरील मोक्याच्या जागीं मोठाल्या जाहिरातींत आकर्षक स्त्रियांचीं मोठालीं चित्रें असतात, तीं कितीतरी अपघातांस कारणीभूत होतात. बसेसच्या मागील बाजूस लावलेल्या जाहिरातींतील अर्धनग्न स्त्रियांना १५ दिवसांत कपडे नेसवले पाहिजेत, असा हुकूम मेक्सिको शहरांतील अधिकाऱ्यांनीं नुकताच काढला. एका दुकानाच्या पायरीवर उभ्या असलेल्या एका सुंदरीच्या हालचालीमुळें न्यूयॉर्क येथील मोटारहाक्याचें रस्त्यावरील वहातुकीकडील लक्ष उडालें व मोठा अपघात झाला. पॅरिसमधील इस्पितळांत एक रुग्ण, एका तरुणीच्या मोहकपणास दीर्घ काळ दोष देत पडला होता. बसमधून उतरणाऱ्या एका सुंदरीकडे पहात पहात हा सायकलस्वार बसवर आदळला होता. पॅरिसमधील एका तरुणीचा स्कर्ट वाऱ्यामुळें उडूं लागला, त्यानें एका फ्रेंच मोटार ड्रायव्हरचें लक्ष वेधून घेतलें आणि त्यामुळें १५ लोकांची इस्पितळांत रवानगी झाली. निदान गर्दीच्या वेळीं तरी स्त्रियांनीं आपल्या हत्याराचा वापर जपून करावा, म्हणजे अपघात टळतील, असें कित्येक अमेरिकन शहरांतील अधिकारी त्यांना विनवून सांगत आहेत.

---

### सावकारी व्याजाचे नवे कमाल दर

मुंबई सरकारनें सावकारी व्याजाचे नवे कमाल दर ठरवून दिले आहेत. तारणावरील कर्जावर ९% आणि तारण नसलेल्या कर्जावर १२% व्याज आतां घेतां येईल. एका वर्षांतील व्याजाची रक्कम एक रुपयापेक्षां कमी भरली, तर सावकार एक रुपया व्याज आकारूं शकेल.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी
दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.
● ६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★
सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

ठेवी स्वीकारण्यांत येतात
ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.
पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००
मुंबई शाखाः-कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## तांदूळ, गहू, ज्वारी, मका, ऊंस व कापूस

"उत्पादन घटीच्या समजास सबळ कारण नाहीं"

( भारतीय शेतकी-संशोधन-मंडळाचे आंकडेवारी सल्लागार डॉ. व्ही. पी. पानसे यांनीं १९१० ते १९४६ या ३६ वर्षांतील उपलब्ध माहितीचा शास्त्रोक्त अभ्यास करून 'ॲग्रिकल्चरल सिच्युएशन इन् इंडिया' च्या ताज्या अंकांतील लेखांत दिलेले निष्कर्ष येथें दिले आहेत. )

अन्नपिकांखालील क्षेत्रफळ जवळ जवळ आहे तेवढेंच असून गेल्या कांहीं वर्षांत उत्पादनांत मात्र डोळ्यांत भरण्यासारखी व क्रमशः घट होत आहे अशी एक भावना सर्वत्र झाल्याचें दिसून येत आहे. या प्रश्नाकडे नियोजनमंडळाचेंही लक्ष वेधलें असून मंडळानें कच्च्या अहवालांत १९४९-५० ला संपलेलीं तीन वर्षे आणि दुसऱ्या महायुद्धास सुरुवात होण्यापूर्वीचीं तीन वर्षे या कालांतील अन्नधान्यांच्या उत्पादनांची तुलना केली आहे. या कालांत अन्नपिकांखालील क्षेत्रफळ १६७ दशलक्ष एकरांवर जवळजवळ स्थिर असतां उत्पादनांत मात्र ४६·१६ दशलक्ष टनांवरून ४२·१ दशलक्ष टनापर्यंत घट झाली असें त्यांत म्हटलें आहे. एकरीं उत्पादनाचा विचार करतां या उत्पादनांत ६१९ रत्तलांवरून ५६५ रत्तलांपर्यंत घट झाल्याचें दिसून येतें.

तथापि ( १ ) अल्पकालांतील उत्पादनांची तुलना करून व ( २ ) अन्नधान्यांचें उत्पादन आणि क्षेत्रफळ यांची अखिल भारतीय एकच मालिका विचारांत घेऊन पिकांचें क्षेत्रफळ आणि उत्पादन यांची प्रवृत्ति कशी आहे यासंबंधीं कोणताही निष्कर्ष काढणें धाडसाचेंच ठरेल. असा कल ठरविण्याचे दृष्टीनें तीन वर्षांचा कालावधि पुरेसा नाहीं; कारण पिकांखालील क्षेत्रफळ आणि उत्पादन या दोघांवरही परिणाम करूं शकणाऱ्या अनुकूल वा प्रतिकूल हंगामाचा त्यावर प्रमाणाबाहेर परिणाम होण्याची शक्यता असते. त्याशिवाय धान्यतूट कांहींशी जास्त आणि जादा उत्पादन कमी दाखविण्याकडे राज्य सरकारांचा असलेला कल यांसारख्या बाह्य गोष्टींचाही पीक-उत्पादनाच्या अंदाजावर अलिकडे कांहीं वर्षे परिणाम होत असतो.

### अभ्यासलेलीं पिकें

तांदूळ—उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, मुंबई व मद्रास.
गहूं—पंजाब, उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश.
ज्वारी—उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, मुंबई व मद्रास.
मका—पंजाब व उत्तर प्रदेश.
ऊंस—पंजाब, उत्तर प्रदेश व मद्रास.
कापूस—पंजाब, मध्यप्रदेश व मद्रास.

### तांदूळ

मध्यप्रदेश व मुंबई राज्यांत या पिकाखालील जमिनींत हळुहळू वाढ होत असून उत्तर प्रदेशांत ती जवळ जवळ पूर्वी इतकीच आहे तर मद्रास राज्यांत तींत घट होत आहे. पाटबंधाऱ्यांखालील जमिनीचा विचार करतां मद्रास राज्यांत ७० ते ८० टक्के आणि मध्यप्रदेशांत १० ते २५ टक्के वाढ झाली आहे. मुंबई राज्यांतही पाटबंधाऱ्यांचीं वाढ होत असली तरी तुलनात्मक दृष्ट्या तेथें त्यांचें प्रमाण बरेंच कमी आहे. मद्रास राज्यांत सुरवातीला उत्पादनांत बरीच वाढ झाली तथापि त्यानंतर तें जवळजवळ स्थिरच आहे. या काळाचा एकूण रीत्या विचार करतां या राज्यांतील उत्पादनांतील वाढ कांहीं अंशीं पाटबंधाऱ्यांतील वाढीमुळें झाल्याचें दिसून येतें. मध्यप्रदेश राज्यांत क्षेत्रफळांत वाढ होऊनही उत्पादनांत वाढ वा घट झाल्याचें दिसून येत नाहीं. कमी असलेल्या पिकासाठी कनिष्ठ प्रतीच्या जमिनी वापरून लागवडीचें क्षेत्र वाढविण्यांत येत असल्यामुळें सर्वसामान्यतः पिकाखालील क्षेत्राच्या वाढीबरोबरच उत्पादनांत घट दिसते. मध्यप्रदेशांत लागवडीच्या केंद्रांत वाढ होऊनही उत्पादन मान स्थिर दिसतें त्यास जादा पाणीपुरवठा, हें कारण असावें. मुंबई राज्यांतील उत्पादनमानांत डोळ्यांत भरण्याजोगी घटीची प्रवृत्ति दिसून आली असून, कोणत्याहि प्रकारची इतर भर न घालतां लागवडीच्या क्षेत्रांत झालेली वाढ हें त्याचें कारण असावें. उत्तर प्रदेशांतही उत्पादनांत घट दिसत असून त्याबाबतच्या माहितीचा समग्र व सखोल अभ्यास केल्याखेरीज त्याचें स्पष्टीकरण देणें अवघड वाटतें.

### गहूं

गव्हाच्या पिकाखालील जमिनींचें क्षेत्र पंजाबांत जवळजवळ स्थिरच होतें तर उत्तर प्रदेशांत त्यांत वाढ दिसून आली. परंतु मध्यप्रदेशांत क्रमशः घट होत आहे. पंजाबांत पाणीपुरवठ्याच्या क्षेत्राच्या टक्केवारींत १० ते ५० टक्के या प्रमाणांत वाढीची प्रवृत्ति दिसून आली तर उत्तर प्रदेशांत ती ४५ ते ६० टक्के या दरम्यान जवळजवळ स्थिरच आहे. उत्पादनाचे बाबतींत पंजाबांत हळुहळू वाढ दिसत असून त्यास कदाचित् पाण्याखालील पिकांच्या प्रमाणांत झालेली वाढ कारणीभूत असेल. परंतु उत्तर व मध्यप्रदेश या राज्यांत मात्र त्याबाबतींत हळुहळू घट होत आहे.

### ज्वारी

ज्वारी खालील लागवडीच्या क्षेत्रांत डोळ्यांत भरण्याजोगी वाढ मध्यप्रदेशांत झाली असून आणि थोड्याबहुत प्रमाणांत ती उत्तर प्रदेशांतही झाली आहे. मुंबई राज्यांत लागवडीचें क्षेत्र जवळजवळ स्थिर असून मद्रास राज्यांत प्रामुख्यानें या मुदतीच्या पूर्वार्धांत निश्चित स्वरूपांत घट झाली. उत्पादनाच्या बाबतींत वरील पूर्वार्धांत मद्रास व मुंबई या दोन्ही राज्यांत बरीच वाढ झाली आहे. परंतु या मुदतीच्या उत्तरार्धांत घट झाली आहे.

### मका, कापूस व ऊंस

लागवडीचें क्षेत्र, पाणीपुरवठ्याचें प्रमाण व उत्पादन यांपैकीं कोणत्याहि बाबतींत पंजाब व उत्तर प्रदेश या अभ्यासिलेल्या दोन्हीं राज्यांत कोणतीहि विशेष प्रवृत्ति दिसून आली नाहीं.

१९४० नंतरचा—म्हणजे कपाशीखालील लागवडीच्या क्षेत्रांत सर्वत्र एकदम बरीच घट करण्यांत आली तो—कालखंड वगळून पंजाबमध्यें लागवडीच्या क्षेत्रांत हळुहळू वाढ होत असून मद्रासमध्यें मात्र घटीची प्रवृत्ति दिसते. उत्पादनाच्या बाबतींत पंजाब व मद्रास या दोन्ही राज्यांत हळुहळू वाढ झाली असून मध्यप्रदेशांत मात्र उत्पादन व क्षेत्र जवळजवळ स्थिर आहे.

पंजाब, उत्तर प्रदेश आणि मद्रास या तिन्ही राज्यांत विशेषतः गेल्या पंधरा वर्षांत उसाखालील क्षेत्रांत व उत्पादनांतही वाढ होत आहे.

### उत्साहवर्धक निष्कर्ष

सर्व पिकांबाबतच्या एकूण निष्कर्ष वेगळा असून यापूर्वी व्यक्त केलेल्या मतांपेक्षां अधिक उत्साहजनक आहे. रोकड पिकांबाबत उत्पादनांत सर्वसामान्यपणें वाढ झाल्याचा स्पष्ट पुरावा असून उसाबाबत तर लागवडीच्या क्षेत्रांतही वाढ झाली असें माहिती वरून सुस्पष्ट झालें.

कोणत्याही राज्यांत अभ्यासलेल्या सर्व पिकांच्या उत्पादनांत एकसारखी घट होत असल्याचें दिसून आलें नाहीं. अलिकडील कांहीं वर्षांत जमिनीच्या सुपिकतेंत किंवा संवर्धनाच्या प्रमाणांत हळुहळू घट होत असल्याच्या समजास सबळ कारण नाहीं.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें मांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल मांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
ॲ. मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल मांडवल : | १२,५०,००० |

## —संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया. चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, चियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

**मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.**

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. — गो. गं. साठे, मॅनेजर.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक टे. नं. २५४६१ | पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमन:—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें मांडवल | रु. ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. ६,९२,८४,९०० |
| खेळतें मांडवल | रु. १३,८०,४९,८०० |

## १५ जिल्ह्यांत ६२ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ॲ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें मांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल मांडवल | रु. ४,००,००० |

## एकूण खेळतें मांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ६२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.